महाराष्ट्र शासन

आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, मुंबई यांचे कार्यालय.

## परिपत्रक

क्र. सीएलई. १०९६/सीआरएम/[९८-क]/एक[म]/चार. मुंबई, १९ डिसेंबर, १९९६.

या कार्यालयाच्या दि. ३० ऑक्टोबर,१९९६ च्या याच क्रमांकाच्या परिपत्रकातील परिच्छेद क्र.११ मध्ये उल्लेख केल्याप्रमाणे देशी/विदेशी दारू किरकोळ विक्री अनुज्ञप्तीधारकाकडून सीलबंद बाटल्यातून होणारी दारू विक्री १ जानेवारी, १९९७ पासून लेबलवरील छापलेल्या किरकोळ विक्रीच्या कमाल किंमतीपेक्षा जास्त किंमतीत होणार नाही याची दक्षता घेणे आवश्यक आहे. या संदर्भात काही मद्य विक्रेत्यांनी शंका उपस्थित केली आहे की, बरेच ग्राहक देशी दारू किरकोळ विक्री अनुज्ञप्तीधारकाकडून सीलबंद बाटल्या [विशेषत: १८० मि.ली. ची] विकत घेऊन तेथेच बाटल्या फोडून दारू सेवन करतात. अशावेळी अनुज्ञप्तीधारक त्यांना आनुषंगिक सेवा [बर्फ पाणी, नोकरसेवा इ.] पुरवितात. अशा दारू विक्रीसाठी किरकोळ विक्रीच्या कमाल किंमतीचे बंधन आवश्यक राहील काय? याबाबतीत त्यांनी खुलासा करण्याची विनंती केलेली आहे. याबाबतीत खुलासा करण्यात येतो की, जेव्हा दारू विक्री सीलबंद बाटल्यातून होईल तेव्हा ती लेबलवर छापलेल्या किरकोळ विक्रीच्या कमाल किंमतीपेक्षा जास्त किंमतीत होणार नाही. जरी ग्राहक देशी दारू किरकोळ विक्री अनुज्ञप्तीधारकाकडून सीलबंद बाटली खरेदी करून तेथेच बाटली फोडून दारू सेवन करीत असतील व अशा ग्राहकांना अनुज्ञप्तीधारक आनुषंगिक सेवा पुरवित असतील तरीसुध्दा अशावेळी सीलबंद बाटल्यातून होणारी दारू विक्रीवर किरकोळ विक्रीच्या कमाल किंमतीपेक्षा जास्त किंमत घेता येणार नाही. मात्र ग्राहकांना पुरविण्यात येणाऱ्या आनुषंगिक सेवेसाठी अनुज्ञप्तीधारकांना ग्राहकाकडून वेगळा सेवा भार आकारता येऊ शकेल. आनुषंगिक सेवा पुरविल्या जातात म्हणून कोणत्याही परिस्थितीत सीलबंद बाटल्यातून होणारी विक्री किरकोळ विक्रीच्या कमाल किंमतीपेक्षा जास्त किंमतीत होणार नाही याची कटाक्षाने दक्षता घ्यावी.

परिपत्रकाची पोच देण्यात यावी.

सही/-
[ सुबोध कुमार ]
आयुक्त

प्रत,
१] सर्व विभागीय उपआयुक्त, राज्य उत्पादन शुल्क.
२] सर्व अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क.

अधीक्षकांना निर्देशित करण्यात येते की, त्यांनी वरील सूचना त्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व देशी दारू किरकोळ विक्री अनुज्ञप्तीधारकांच्या नजरेस आणून द्याव्यात. तसेच सर्व

..२..

कार्यकारी अधिकाऱ्यांना यासंबंधी आवश्यक त्या सूचना द्याव्यात व तसे या कार्यालयास अवगत करावे.

- - - - - - - - - - - -

क्रमांक. सीएलओआर. ११९६/१२४०८/सी-३. मुंबई, २३ डिसेंबर, १९९६.

प्रत माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

१] उपअधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, मुंबई शहर १ व २.
२] सर्व विभागीय निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, मुंबई [शहर].
३] निरीक्षक/दु. निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, भरारी पथक, मुंबई शहर-१ व २.
४] सर्व विभागीय दुय्यम निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, मुंबई शहर.
५] आस्थेव शाखा ५ प्रती.

निरीक्षकांना कळविण्यात येते की, सदर परिपत्रकातील सूचना त्यांच्या विभागातील सीएल.३ अनुज्ञप्तीधारकांच्या निदर्शनास आणून त्याची पोच त्यांच्या अभिलेखावर ठेवावी. तसेच सदर परिपत्रकाची यास दूतां मार्फत पोच देण्यात यावी.

अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क,
मुंबई [शहर]

साविदं/२३.१२.९६